महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/७५८१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ०५.०३.२०२०

# परिपत्रक

**विषय : कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर पुढील आदेशांपर्यंत स्थगित करण्याबाबत.**

सद्यस्थितीत जगभरातील बहुतांश देशामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार झाला असून त्यामुळे आरोग्यविषयक गंभीर परिणाम तसेच जिवित हानी होत असल्याचे दिसून येते. सदरच्या विषाणू हा संसर्गजन्य असून, कोरोना विषाणू मुळे बाधित झालेले रूग्ण काही ठिकाणी आढळून आले आहेत.

२. याच पार्श्वभूमीवर महावितरण मधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या आरोग्यविषयक बाब विचारात घेता, कोरोना विषाणूचा प्रसार कार्यालयांमध्ये होउ नये यास्तव प्रतिबंधात्मक / खबरदारीचा उपाय म्हणून कंपनीच्या सर्व कार्यालयांमधील बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर करण्यास पुढील आदेशापर्यंत स्थागिती देण्यात येत आहे.

३. सदर कालावधीमध्ये कर्मचाऱ्यांची उपस्थिती हजेरी पत्रक नोंदवही मध्ये नमूद करण्यात यावी, सदरच्या हजेरी अहवालानुसार अनुषंगिक बाबींविषयी कार्यवाही करण्यात यावी.

४. सदरचे परिपत्रक तात्काळ लागू करण्यात येत आहे.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)**(से.नि.)
**मुख्य महाव्यवस्थापक(मासं)**